महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-१० अंक-२

फेब्रुवारी - मार्च २०१६

प्रिय कर्मचारी बंधु आणि भगींनीनो,

महापारेषण कंपनी दरवर्षीप्रमाणे ह्यावर्षी सुध्दा चांगली कामगिरीच्या बळावर चांगले परिणाम देईल याची मला खात्री आहे. शेवटच्या महिन्यात आपण विभाग प्रमुखांकडुन त्यांचा २०१५-२०१६ या संपुर्ण वर्षाच्या कामगिरीचा आढावा घेत असतो व त्यातुनच पुढील २०१६-२०१७ या वर्षाच्या कामगिरीचे नियोजन सुध्दा करण्यात येत आहे. विभाग प्रमुखांच्या कामगिरीचे नियोजन झाल्यानंतर, तद्नुसार सर्व वेतनगट १ व २ मधील अधिकारी वर्गाचे कामगिरीचे नियोजन व्हावे हे अपेक्षित आहे.

Failing to Plan is Planning to Fail हे त्याकरीता म्हटले जाते. नियोजन हा कोणत्याही संघटनेचा आधार राहतो. त्याकरीता सर्व संबंधीतांचे त्यामध्ये सहभाग असणे गरजेचे असते. सहभागामुळे कोणताही महत्वाचा घटक सुटत नाही व सांघिक जबाबदारी त्या कामगिरीच्या बाबत निर्माण होते.

वर्ष २०१५-२०१६ मध्ये अनेक अभिनव उपक्रम आपण हाताळले. SLDC चे सक्षमीकरण, S/S व Lines Projects चे Barrier Breaking आढावा व परिक्षण, O&M च्या कार्यपध्दतीत सुटसुटीतपणा व विकेंद्रीकरण, Projects Design चे Standardization, STU मध्ये भरीवता, व्यापकता व स्वायत्ता आणणे, F&A मध्ये विकेंद्रीकरण व वित्तीय नियोजन अधिक भक्कम करणे, HRD मध्ये देशातील अग्रगण्य संस्थेतून तांत्रिक व व्यवस्थापकीय प्रशिक्षण वेतनगट १ व २ करीता देणे, प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राची व्याप्ती वाढवणे व त्यातून महावितरण व इतर राज्यातील पारेषण कंपनीना प्रशिक्षण देण्याची योजना राबविणे, अधिकारी/कर्मचारी यांच्या करीता Mediclaim सारख्या कल्याणकारी योजना कार्यान्वित करणे, मनुष्यबळाचे नियोजन व पुरवठा करणे आदी. उपक्रम राबविण्यात आपल्याला यश आले. Projects Design, O&M and F&A विभागाचे परिपत्रके व मार्गदर्शकतत्वे एकत्रित करून त्याचे Compendium तयार करून ते Field Office च्या वापराकरीता देण्यात आले त्यामुळे, सामान्य व्यक्तीस शोधा शोध न करता, उचित मार्गदर्शन ह्या पुस्तिकेतून प्राप्त होवू शकते. CSR Policy, PAP Policy, ERP-SRM, Re-Organization of Units, Review of Staffing Norms ह्या प्रकारची उपक्रमे सुध्दा हाती घेण्यात आली व ती जवळ जवळ पुर्णत्वाला आली आहेत. System Availability (HVDC/HVAC) मध्ये MERC ने ठरवून दिलेल्या Benchmark च्यावर आपली कामगिरी नेण्यात ह्यावर्षी सुध्दा आपल्याला यश आले.

अश्याप्रकारे वर्ष २०१६-२०१७ ची कामगिरी उत्साही व गतवर्षाच्या पुढे राहील अशी मला आशा आहे. त्याकरीता आपल्या सर्वांना कटीबध्द राहीले पाहिजे. समाधानी न राहता, सतत अभ्यास करत System ची Vulnerabity Factors ओळखुन त्यावर मात करता आली पाहिजे. चांगल्या प्रकारचे समन्वय साधुन रखडलेली प्रकरणांची कामे सुध्दा पुर्ण करता आली पाहिजे. सर्व विभागाने चांगल्या कामगिरीकरीता एकमेकांवर विसंबुन असतात, त्यामुळे एक संघ होवून सर्व विभागांनी कार्य करणे गरजेचे राहते. स्पर्धा न करता योगदानावर लक्ष ठेवले असता एक वेगळा आनंद आपल्याला प्राप्त होतो.

Productivity वाढविणे, नाहक खर्च कमी करणे, Safety and Security व सर्वांना समान संधी ह्या बाबी कार्यपध्दतीमध्ये महत्वाच्या घटक ठरतात. सर्वाच्या कार्यकुशलतेमध्ये वैविधता असणे महत्वाचे त्याकरीता प्रत्येकाने आपल्या कार्यामध्ये वेळेनुरूप बदल करून घेणे संघटनेच्या दृष्टीने चांगले राहते. O&M, Projects, Testing, STU, SLDC,



राजीव कुमार मित्तल
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

CPA, ERP आदी विषयांचा अभ्यास असणे एका आदर्श अभीयंत्यास गरजेचे राहते जेणेकरून वरच्या पातळीवर जबाबदारी पार पाडणे सोपे जाते व त्या पदास आपणास उचित न्याय देता येतो.

सर्व Equipments चा अभ्यास करणे, त्यांचे Project Manual अवलोकन करणे व त्यांचे संपुर्ण बारकावे माहिती करून घेणे असे केले असता आपण त्या विषयात परिपुर्ण होतो व त्या विषयाबाबत Expert Opinion आपण देवू शकतो.

वर्ष २०१६-२०१७ चांगल्या नियोजन तथा कृती करीता आपणा सर्वांना शुभेच्छा.

शुभेच्छांसह!

**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांची अतिउच्च दाब बांधकाम नि संवसु परिमंडळ नाशिक कार्यालयास भेट





महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, मा. श्री. राजीव कुमार मित्तल यांनी दिनांक २९.०१.२०१६ रोजी अतिउच्च दाब बांधकाम नि संवसु परिमंडळ नाशिक या कार्यालयास भेट दिली. यावेळी मा. मुख्य अभीयंता, श्री. बी. टी. राऊत यांनी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

दिनांक २९.०१.२०१६ रोजी नाशिक परिमंडळ कार्यालयात अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. राजीव कुमार मित्तल यांनी दैनंदीन कामाचा आढाव घेतला. तसेच परिमंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जोमाने कामे करण्यासंदर्भात सुचना दिल्या.

यावेळी त्यांच्या सोबत मा. श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (संचलन), श्री. रविंद्र चव्हाण, संचालक (प्रकल्प) हे उपस्थित होते. तसेच परिमंडळ कार्यालयातील मुख्य अभीयंता, श्री. बी. टी. राऊत, अधीक्षक अभीयंता श्री. एस. पी. वसेकर, श्री. एम. एल. गुट्टे, श्री. एम. आर. भगत, श्री. आर. एस. कांबळे तसेच श्री. प्रशांत चौधरी, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.) व श्री. मिलींद घोलप, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले), श्री. एस. एस. नवलाखे, कार्यकारी अभीयंता (प्रशासन) यांच्यासह परिमंडळ कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांची (अउदा) संवसु मंडळ, खडका येथे भेट





मा. श्री. राजीव कुमार मित्तल, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, यांनी दिनांक २५.०२.२०१६ रोजी अउदा (संवसु) मंडळ, खडका येथे सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी अउदा बांधकाम तथा संवसु परिमंडळ, नाशिक येथील मुख्य अभीयंता, श्री. भाऊराव राऊत यांनी त्यांचे स्वागत केले. सदर बैठकीत श्री. संजय आत्राम, अधीक्षक अभीयंता, अउदा संवसु मंडळ, खडका व इतर कार्यकारी अभीयंते यांनी जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्ह्यातील आपआपल्या विभागातील पारेषण कंपनीच्या कामाचा आढावा सादर केला. उपकेंद्रातील कामे व जबाबदाऱ्या यांचे विस्तृत सादरीकरण केले.

वरील कामाच्या अहवालाचे सादरीकरण श्री. राजीव कुमार मित्तल यांनी १३२ के. व्ही. उपकेंद्र ई. सी. आर/ जि. सी. आर तसेच ४०० के. व्ही. ग्रहणकेंद्र विभाग, खडका – भुसावळ येथील उपकेंद्रांना भेट दिली. यावेळी श्री. भाऊराव राऊत, मुख्य अभीयंता, श्री. श्रीराम भोपळे, अधीक्षक अभीयंता, श्री. माणिक गुट्टे, अधीक्षक अभीयंता, श्री. संजय आत्राम, अधीक्षक अभीयंता व मंडळांतर्गत कार्यरत सर्व कार्यकारी अभीयंते, इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## नवीन १ ३ २ के. व्ही. गोसेखुर्द उपकेंद्र कार्यान्वित

१ ३ २ के. व्ही. उपकेंद्र, गोसेखुर्द, तहसील पवनी, जिल्हा भंडारा येथे दि. ०१.०३.२०१६ रोजी कार्यान्वित करण्यात आले, त्याकरीता १ ३ २ के. व्ही. आसगाव –पागोरा या वाहिनीवर ८.८२ कि. मी. ची वीज वाहिनी LILO करण्यात आली.



दि. ०१.०३.२०१६ रोजी १३२के. व्ही. गोसेखुर्द उपकेंद्रातील १३२/३३, २५ एम.व्ही.ए. रोहित्र कार्यान्वित करण्यासाठी मुख्य अभीयंता, श्री. मिलींद बहादुरे, यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच श्री. अविनाश निंबाळकर, अधीक्षक अभीयंता, अउदा बांधकाम प्रविभाग, नागपूर, श्री. अविनाश कोंडावार , अधीक्षक अभीयंता, संवसु प्रविभाग, नागपूर, श्री. अद्वैत देव, अधीक्षक अभीयंता, चाचणी व दूरसंचार प्रविभाग, नागपूर, श्री. सुनिल सारडे, कार्यकारी अभीयंता, चाचणी विभाग, नागपूर व श्री. मलिक, प्रभारी कार्यकारी अभीयंता, संवसु विभाग, भंडारा यांच्या उपस्थितीत कार्यान्वित करण्यात आले.

त्याचे निष्कासन १ ३ २ के. व्ही. गोसेखुर्द उपकेंद्र येथून होणार आहे. त्यामुळे पवनी तहसील व त्याभागातील कमी वीज दाबाची समस्या संपुष्टात येणार आहे. २४ मे. वॅ. वीज निर्मीती च्या निष्कासनामुळे १ ३ २ के. व्ही. आसगाव व पागोरा उपकेंद्रासाठी १ ३ २ के. व्ही. गोसेखुर्द उपकेंद्रावरून पर्यायी दुसरा स्त्रोत उपलब्ध झाला असून अखंडित वीज पुरवठा करणे शक्य होणार आहे.



१ ३ २ के. व्ही. गोसेखुर्द उपकेंद्र व त्याकरीता १ ३ २ के. व्ही. आसगाव – पागोरा LILO वीज वाहिनी कार्यान्वित करण्याकरीता श्रीमती वैशाली पाटील, कार्यकारी अभीयंता, अउदा बांधकाम विभाग -२, महापारेषण, नागपूर, श्री. संजय वाढवे, अतिरीक्त कार्यकारी अभीयंता, श्री. मनोज बोंद्रे, सहाय्यक अभीयंता, अउदा बांधकाम उपविभाग, भंडारा व इतर कर्मचारी वर्गाने यासाठी अथक प्रयत्न केले आहेत.

## २२० के. व्ही. अल्ट्राटेक उपकेंद्र कार्यान्वित

२२० के. व्ही. अल्ट्राटेक उपकेंद्र, तहसील -मौद, जिल्हा- नागपूर दि. १५.०३.२०१६ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे. त्या करीता २२०के. व्ही. कन्हान- भंडारा-२ LILO वीज वाहिनी - १.००५ कि. मी. दिनांक १५.०३.२०१६ रोजी कार्यान्वित करण्यात आली. यामुळे मे. अल्ट्राटेक सिमेंट वर्क, मौदा येथील त्यांच्या कारखाण्यासाठी २२०के. व्ही., १२.५ मे. वॅ. वीज पुरवठा करणे शक्य झाले आहे.

२२० के. व्ही. अल्ट्राटेक उपकेंद्र व वीज वाहिनी चे काम DDF अंतर्गत मे. अल्ट्राटेक यांनी अउदा बांधकाम विभाग – २, महापारेषण , नागपूर यांच्या देखरेखी अंतर्गत यशस्वी रित्या कार्यान्वित करण्यात आले आहे. मे. अल्ट्राटेक यांना २२० के. व्ही. चा वीज पुरवठा करण्यासाठी २२० के. व्ही. अल्ट्राटेक उपकेंद्र व LILO वीज वाहिनी कार्यान्वित करण्यासाठी मुख्य अभीयंता, श्री. मिलींद बहादुरे, यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच श्री. अविनाश निंबाळकर, अधीक्षक अभीयंता, अउदा बांधकाम प्रविभाग, नागपूर, श्री. अविनाश कोंडावार, अधीक्षक अभीयंता, संवसु प्रविभाग, नागपूर, श्री. अद्वैत देव, अधीक्षक अभीयंता, चाचणी व दूरसंचार प्रविभाग, नागपूर, श्री. सुनिल सारडे, कार्यकारी अभीयंता, चाचणी विभाग, नागपूर व श्री. तट्टे, कार्यकारी अभीयंता, संवसु विभाग, भंडारा यांच्या उपस्थितीत कार्यान्वित करण्यात आले. श्रीमती वैशाली पाटील, कार्यकारी अभीयंता, अउदा बांधकाम विभाग -२, महापारेषण, नागपूर, श्री. संजय वाढवे, अतिरिक्त कार्यकारी अभीयंता, श्री. मनोज बोंद्रे, सहाय्यक अभीयंता, अउदा बांधकाम उपविभाग, भंडारा व इतर कर्मचारी वर्गाने यासाठी अथक प्रयत्न केले आहेत.

## ४०० के.व्ही. उपकेंद्र, कुंभारगाव (जिल्हा नांदेड) आणि ४०० के.व्ही. चंद्रपूर – परळी द्विदल वाहिणी उपकेंद्रा करीता काम पूर्ण

महापारेषण कंपनीतर्फे ४०० के.व्ही. उपकेंद्र, कुंभारगाव (जिल्हा नांदेड) आणि ४०० के.व्ही. चंद्रपूर – परळी द्विदल वाहिनी उपकेंद्रा करीताचे काम पूर्ण झाले असून सदरील उपकेंद्र व वाहिनी दि.११.०२.२०१६, २२.०२.२०१६ अनुक्रमे रोजी कार्यान्वित व भार घेण्यात आला. सदरील काम हे युध्द पातळीवर करण्यात आले.



तदपूर्वी, नांदेड जिल्ह्याच्या वीजेचा तुडवडा आणि दिवसेंदिवस मागणीत होणारी सततची वाढ लक्षात घेता, सदरील विजेच्या वाढत्या मागणीमुळे सदरील पुरवठा करणारे ४० के.व्ही. गिरवली मधील (रोहीत्र) उपकेंद्रावर जादा भार येत होता, त्यामुळे मागणीप्रमाणे ऑक्टोबर व नोव्हेंबर - २०१५ मध्ये काही अंशी नांदेड जिल्ह्यामध्ये जवळपास १००-१५० MW विजेचा तुडवडा भासत होता.

सदरील उपकेंद्र कार्यान्वित झाल्यामुळे विजेच्या मागनिरुप पारेषण प्रणाली सक्षम झाली असून, त्यामुळे ३०० MW नांदेड जिल्हा व १०५ ऐं परभणी जिल्हयाची विजेची मागणी पूर्तता केली आहे. त्यामुळे मागणी आणि पुरवठा यांच्यामधील जी तफावत होती ती भरून निघाली असून उपकेंद्रामुळे किनवट (जि.नांदेड), हिमायतनगर (जि.नांदेड) या टोकाच्या तालुक्यातील ५ ते ६ के.व्ही. वोल्टेज मध्ये वाढ झाली आहे, नांदेड जिल्ह्यामधील "VOLTAGE PROFOILE" मध्ये कमालीची सुधारणा झाली आहे, तसेच महापारेषण आणि महावितरण यांची यंत्रणा सक्षम झाली आहे.

वरील उपकेंद्र व वाहिनी काम पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम व मेहनत घेतल्यामुळे झाले, ते सर्व श्री. गणपत मुंडे, मुख्य अभियंता, परिमंडळ, औरंगाबाद, अधिक्षक अभियंता, श्री. अरूण वाघमारे, श्री. शंशाक जेवळीकर, श्री. स्वामी, श्री. गोविंद जाधव, कार्यकारी अभियंता, श्री. मिलिंद बनसोडे, श्री. दिपक पाटील, श्री. पाटील, श्री. शेंदूरवाडकर, अतिरिक्त कार्यकारी अभीयंता, श्री. संजय नलबलवार, श्री. गौतम राऊत, श्री. राजूरकर, श्री. संजय लोंढे, श्री. अशफाक अहमद, श्री. रविंद्र काकडे , श्री. फिरदोस कुराणी, श्री. संजय महाले, श्री. रमेश तालोड, श्री. वामन गाजरे, श्री. हनिफ, श्री. श्रीमलवार, उपकार्यकारी अभियंता, श्री. माधव चिलक, श्री. फरहान सिद्दिकी, श्री. मो. असलम, श्री. अभय कदम, श्री. सुनिल केराम, श्री. बशर, सहाय्यक अभीयंता, श्री. ब्रिजकिशोर शॉ, श्री. रविप्रकाश मिश्रा, श्री. पाठक, श्री. किरण सोनखेडकर, श्री. कंदलवाड, श्री. अजय कांबळे, कु. नयन शेळके तसेच अउदा बांधकाम विभाग, नांदेड व चाचणी विभाग नांदेड अंतर्गत सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## अउदा बांधकाम नि संवसु परिमंडळ वाशी येथे "छत्रपति शिवाजी महाराज जयंती" उत्साहात साजरी

अउदा बांधकाम नि संवसु परिमंडळ, वाशी येथे दिनांक १९ फेब्रुवारी २०१६ रोजी परिमंडळाचे मुख्य अभीयंता, श्री. संजय शिंदे यांच्या उपस्थितीत 'छत्रपति श्री. शिवाजी महाराज जयंती" साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमाप्रसंगी श्री. संजय शिंदे, मुख्य अभीयंता, वाशी यांच्या हस्ते छत्रपति शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर सर्व उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी छत्रपति शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्याबद्दल विचार मांडले. श्री. संजय शिंदे, मुख्य अभीयंता यांनी कर्मचाऱ्यांना संबोधित केले.

या कार्यक्रमा प्रसंगी श्री. प्रशांत कुलकर्णी, श्रीमती विभावरी बाविसकर, अतिरीक्त कार्यकारी अभीयंता, श्री. मनीष चौरे, उपकार्यकारी अभीयंता, श्री. अनंत सहस्त्रबुद्धे, सहमुख्य दक्षता अधिकारी तसेच श्री. सिद्धार्थ जाधव, श्री. सुभाष सोनवणे, उपव्यवस्थापक (मा.सं.), यांच्या व्यतिरीक्त परिमंडळ कार्यालय, वाशी व चाचणी व संचारण मंडळ, वाशी येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महापारेषण कंपनीच्या महाराष्ट्रातील सर्व कार्यालयात छत्रपति श्री. शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या थाटात साजरी करण्यात आली.

## 'प्रकाशगंगा'सांघिक कार्यालय येथे "छत्रपति शिवाजी महाराज जयंती" उत्साहात साजरी





दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महापारेषणच्या प्रकाशगंगा या मुख्य कार्यालयात दिनांक १९ फेब्रुवारी २०१६ रोजी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपति श्रीमानयोगीश्री.शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक(संचलन), हे होते.

श्री. एम्पाल साहेब यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व उपस्थितांकडून प्रतिमेस माल्यार्पण करून शिवजयंती कार्यक्रमाची सुरवात झाली.

याबरोबरच कार्यकारी संचालक (मा.सं.), श्री. सुरज वाघमारे, मुख्य महाव्यवस्थापक (मा. सं.), श्री. माधव पेन्दोर हेउपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित सर्व वरिष्ठ अधिकारी यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना छत्रपति श्री. शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्याचा परिचय करून देतांनाच त्यांच्या स्वराज्याविषयीची संकल्पना या विषयी ही सविस्तर मार्गदर्शन केले.

याप्रसंगी मुख्य कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## Transmission Projects Commissioned by Nagpur Zone

Nagpur Zone successfully commissioned 400KV Koradi-II to Wardha D/C Transmission line route length 238.912 CKm & 220KV Koradi-II to Khaparkheda D/C Transmission line route length 27.55 CKm essential for Evacuation of New 660x3 MW Koradi-II Generation Plant at Koradi Dist: Nagpur under the Guidance of Shri. Milind Bahadure, Chief Engineer, EHV CC O&M Zone, The work was supported by Shri. Avinash Nimbalkar,Superintending Engineer, EHV Construction Circle, Shri. Avinash Kondawar Superintending Engineer, EHV O&M Circle, Shri. Advait Dev, Superintending Engineer, Testing Circle,Shri. Anil G. Patil, Executive Engineer, EHV Construction Division-I, Shri. Narendra Wankhade, Executive Engineer 400KV Koradi-II S/stn, Shri. Padmakar Dixit, Executive Engineer, Telecom Division, Shri. Sunil Sarde, Executive Engineer, Testing Division, Shri. Ajay Athavale, Addl.Executive Engineer, S/Stn Construction S/Division, Shri. Avinash Raut, Addl. Executive Engineer, 400KV Lines Construction S/Division, Shri. B. P. Agrawal, Addl. Executive Engineer, EHV Construction Division-I, Shri. Rahul Meshram, Manager, F&A, Shri. Rahul Nandurkar Dy. Executive Engineer, Aarti Dongre Dy. Executive Engineer, Amol Thubalkar, Assistant Engineer, Yashika Jaiswal, Assistant Engineer, Soni Thaore, Assistant Engineer, Manish Sahare, Assistant Engineer & Meenashree Rathore, Assistant Engineer.

Maharashtra State Electricity Transmission Company Limited had awarded the projects to M/s Cobra-KCL (JV) & M/s B. G .Shirke under turnkey project at estimated cost of Rs. 246.8 crore.

Construction activities of projects was executed by EHV Construction Division-I, MSETCL,Nagpur.

## Commissioning of 400/220 KV ICT – II and 220 KV Bays at 400 KV Koradi – II S/s. Nagpur Zone

Under EHV CC O&M Zone, MSETCL, Nagpur at 400 KV Koradi – II S/s. 400/220 KV, 500 MVA ICT – II is commissioned on dt. 23.11.2015. Its LV Bay along with 220 KV Bus – I & II and 220 KV Line bays for Khaperkheda Ckt – I & Khaperkheda Ckt – II is commissioned successfully on dt. 30.03.2016

The above work is completed under the guidance of Shri. Milind Bahadure, Chief Engineer, EHV CC O&M Zone, Nagpur, Shri. Avinash Nimbalkar, Superintending Engineer, EHV Construction Circle, and supported by Shri. Sunil Sarde, Executive Engineer Testing Division.

Maharashtra State Electricity Transmission Company Limited had awarded the projects to M/s BHEL under turnkey project at estimated cost of Rs. 106 crore.

Construction activities of projects were executed by EHV Construction Division – II, MSETCL, Nagpur & Mrs. Vaishali Patil, Executive Engineer, EHV Construction Division – II, Shri. Manish D. Vaidya, Addl. Executive Engineer, & Miss. Swati Gajbhiye, Assistant Engineer, Shri. C. Ramaswamy, Sr. Technician, Shri. Aanad, Jr. Technician, Shri. Gupta, Jr. Technician, 400 KV Substation Construction S/dn., MSETCL, Nagpur has taken efforts for commissioning of ICT & 220 KV Bays.

## प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, तळदंगे, कराड परिमंडळ येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा

महापारेषणच्या कराड परिमंडळातंर्गत प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, तळदंगे येथे दिनांक ०८.०३.२०१६ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात पार पडला.




सदर कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून राजाराम बापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इस्लामपूरच्या प्राचार्या डॉ. श्रीमती सुषमा कुलकर्णी (पी.एचडी., स्थापत्य) व न्यू कॉलेज, कोल्हापूरच्या प्राध्यापिका डॉ. श्रीमती अरुंधती पवार (एम.ए., एम. फील., पी.एचडी.) यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उदघ्ाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. श्रीमती कुलकर्णी यांनी आपल्या व्याख्याणात "महिला समाजाची रचनाकार" या विषयावर उपस्थित महिलांना संबोधित करून महिलांना नवीन आव्हाने स्विकारण्याबाबत मार्गदर्शन केले.

त्याचप्रमाणे डॉ. श्रीमती कुलकर्णी यांनी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, तळदंगे येथील परिसराची पाहणी करून, समाधान व्यक्त केले व सदर प्रशिक्षण केंद्रात अभियांत्रीकीच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्याबाबत सकारात्मक निर्णय घेऊ अशी ग्वाही दिली. तसेच डॉ. श्रीमती अरुंधती पवार यांनी "महिला सबलीकरण वस्तुस्थिती व अपेक्षा" या विषयावर उपस्थित महिला अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमास श्रीमती शिल्पा कुंभार, अधीक्षक अभीयंता, चाचणी व दूरसंचारण मंडळ, कराड, श्री. संदीप हाके, अधीक्षक अभीयंता (स्थापत्य), अउदा स्थापत्य मंडळ, कोल्हापूर श्री. अविनाश शिंदे, अधीक्षक अभीयंता, अउदा बांधकाम मंडळ, कोल्हापूर कार्यकारी अभीयंते, महिला अधिकारी व कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## कार्यकारी संचालक (मा. सं.) यांची क्रॉम्पटन ग्रीव्हज् प्रशिक्षण केंद्रास भेट




मा. कार्यकारी संचालक (मा. सं.) श्री. सुरज वाघमारे यांनी दि २५.२.२०१६ रोजी नाशिक येथील क्रॉम्पटन ग्रीव्हज् प्रशिक्षण केंद्रास भेट दिली. या प्रशिक्षण केंद्रात महापारेषणचे अभीयंते 'Hands on training on substation equipments' या विषयावर प्रशिक्षण घेत आहेत. श्री. वाघमारे यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाचा आढावा घेतला व प्रशिक्षणार्थी अभियंत्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी महापारेषणचे श्री. संजय कुमार, मुख्य सुरक्षा अधिकारी, श्री. सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा. सं. तां.), श्री. सुधीर वानखोडे, महाव्यवस्थापक (मा. सं. अतां), श्री. शशिकांत बाकरे, अधीक्षक अभीयंता (प्रशिक्षण) व क्रॉम्पटन ग्रीव्हज् कंपनीचे श्री. सचिन वालझडे व श्री. अमोल वाघमारे उपस्थित होते.

## अमरावती परिमंडळात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



अमरावती परिमंडळ कार्यालयात दिनांक ०८.०३.२०१६ रोजी "जागतिक महिला दिन" उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान मा. श्री. एस. जे. पाटील, मुख्य अभीयंता, अउदा बां. नि संवसु परिमंडळ, अमरावती यांनी भूषविले. या प्रसंगी श्री. प्रफुल्ल अवघड, अधीक्षक अभीयंता (पारेषण), श्री. वंदनकुमार मेंढे, अधीक्षक अभीयंता (पारेषण) श्री. अ. व. कसबेकर, अधीक्षक अभीयंता (स्थापत्य), श्री. एच. पी. राठोड, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.), उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये परिमंडळातंर्गत कार्यरत महिला अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फुर्त सहभाग घेवून जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. एस. जे. पाटील, मुख्य अभीयंता, अउदा बां. नि संवसु परिमंडळ, अमरावती यांनी अध्यक्षीय भाषणात सर्व महिला अधिकारी व कर्मचारी यांना मोलाचे मार्गदर्शन केले. जागतिक महिला दिनानिमीत्त उपस्थित सर्व महिला अधिकारी व कर्मचारी यांना भेट वस्तू व पुष्प देवून यथोचित सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमास अमरावती परिमंडळातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्रीमती स्नेहा अलाटे, उप व्यवस्थापक (विवले) यांनी केले व आभार प्रदर्शन कु. आरती कोकाटे, सहाय्यक अभीयंता (पारेषण) यांनी केले.


## ASCI, हैद्राबाद येथे प्रशिक्षण शिबीर

महापारेषणच्या प्रशिक्षण व संशोधन विभागामार्फत नियमीतच अधिकरी व कर्मचारी यांच्या कौशल्य विकासा करीता विविध विषयावर प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून दि. १४ ते १८ डिसेंबर २०१५ या कालावधीत महापारेषण तर्फे अधिकारी व कर्मचारी वर्गाकरिता पाच दिवसीय नेतृत्व विकास या विषयी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन महापारेषणच्या प्रशिक्षण व संशोधन विभागातर्फे हैद्राबाद येथील ॲडमिनीस्ट्रेटिव्ह स्टाफ कॉलेज येथे आयोजित केले होते. त्यात महापारेषणच्या पाच महिला अधिकारी यांनी सहभाग घेतला होता.



## FROM THE DESK OF ED (HR)

# महिला सक्षमीकरण




८ मार्च हा दिन 'जागतिक महिला दिन' म्हणून साजरा केला जातो. संपूर्ण जगात ह्या दिवशी महिलाकरीता विविध महिला केंद्रीत कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. भारतात महिलांना फार वेगळं व आदराचे स्थान आहे. स्त्रीला जननी, माता म्हणून संबोधले जाते. मात्र काही महिलांना अत्याचारांना सामोरे जावे लागलेले काही घटनांवरून दिसून येते.

स्त्री शिक्षण अतिशय महत्वाची बाब आहे. शिक्षणामुळे अन्याय व अत्याचारावर मात करण्याची शक्ती मिळू शकते. चांगल व वाईट याचा बोध होतो. खऱ्या स्वरूपात महिला सक्षम होते. चूल-मुल, अबला नारी ह्या भूतकाळातील गोष्टी ठरल्या पाहिजेत. अबला नारी न रहाता ती सबला नारी झाली पाहिजे. स्वत:चे निर्णय घेता आले पाहिजे व अन्यायाविरूध्द लढा देता आला पाहिजे.

बालविवाह, स्त्रीभ्रूण हत्या इत्यादी आजही ग्रामीण भागात काही अंशी आढळतात. त्यामध्ये बदलाकरीता आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. स्त्री-पुरूष भेदभाव बाळगू नये, शिक्षण, रोजगार, समान वागणुक ह्यामुळे महिला सक्षमीकरणास गती मिळेल. महिलांना प्रोत्साहन दिले पाहिजे. काही प्रमाणात सवलती देवून त्यांना आपला स्तर वाढविण्यास मदत केली पाहिजे. उदा. Education Loan, Housing Loan, Women Reservation, SHG, microfinance etc.

स्त्री शिकते तेंव्हा संपूर्ण समाजाची प्रगती होते. कारण ती समाजाचा केंद्रबिंदू असते. आपण सर्व कटीबध्द होवूया कि आपण आपल्या परिणे महिला सक्षमीकरण करण्यास योगदान करू.

.

शुभेच्छांसह!

From the Desk of ED(HR)

### महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे फेब्रुवारी ते मार्च २०१६

| नियुक्ती- | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नाव | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
| १ | निरंक | - | - | - |
| निवृत्ती- | | | | |
| अ.क्र. | नाव | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
| | निरंक | - | - | - |

संपादक : श्री.संदीप नरडेले, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published By: The Public Relation Officer, MSETCL, Mumbai

Published at: Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400051
The Company accepts no responsibility for matter published in the journal